**क्षेत्रीय महाव्यवस्थापक, वे. को. लि बल्लारपुर क्षेत्र, ता. राजुरा, जि. चंद्रपुर यांनी त्यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादनाकरिता मे. वे.को.लि एकत्रित गौरी पौनी खुली खाण येथे महाराष्ट्र (उत्पादन क्षमता - ६.७५ दसलक्ष टन/वर्षे ते ९.० दषलक्ष टन/वर्षे, प्रकल्प क्षेत्र २३८६.९४ हेक्टर ते ३१५८.७९ हेक्टर) प्रकल्पाच्या विस्तारीकरण प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतीवृत्त**

---

दिनांक : ०६.०१.२०२६
वेळ : सकाळी ११:०० वाजता
स्थळ : मनोरंजन केंद्र, वे.को.लि. सास्ती वसाहत, धोपटाळा, ता. राजुरा जि. चंद्रपुर

**प्रस्तावना:-**

क्षेत्रीय महाव्यवस्थापक, वे. को. लि बल्लारपुर क्षेत्र, ता. राजुरा, जि. चंद्रपुर यांनी त्यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादनाकरिता मे. वे.को.लि एकत्रित गौरी पौनी खुली खाण येथे महाराष्ट्र (उत्पादन क्षमता - ६.७५ दसलक्ष टन/वर्षे ते ९.० दसलक्ष टन/वर्षे, प्रकल्प क्षेत्र २३८६.९४ हेक्टर ते ३१५८.७९ हेक्टर) प्रकल्पाच्या विस्तारीकरण प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक ०६ सप्टेंबर २०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

क्षेत्रीय महाव्यवस्थापक, वे.को.लि बल्लारपुर क्षेत्र, ता- राजुरा, जि- चंद्रपुर यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २०/१०/२०२५ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०६ जानेवरी २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी १)स्थानिक मराठी वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन २) स्थानिक मराठी वृत्तपत्र, नवराष्ट्र ३) राष्ट्रीय वृत्तपत्र द टाईम्स ऑफ इंडीया, नागपूर यात इंग्रजीत ४) राष्ट्रीय वृत्तपत्र हितवाद, नागपूर यात इंग्रजीत दिनांक ०३/१२/२०२५ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला

होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरन व वातावरन बदल मंत्रालय, VCA समोर, सिवील लाईन्स, नागपुर
४. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
९. नगर परिषद, राजुरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१०. तहसिल कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
११. पंचायत समिती कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१२. ग्राम पंचायत कार्यालय, सास्ती, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१३. ग्राम पंचायत कार्यालय, साखरी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१४. ग्राम पंचायत कार्यालय, निमनी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१५. ग्राम पंचायत कार्यालय, पोवनी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१६. ग्राम पंचायत कार्यालय, गोवरी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१७. ग्राम पंचायत कार्यालय, चार्ली, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१८. ग्राम पंचायत कार्यालय, मानोली, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
१९. ग्राम पंचायत कार्यालय, गोयेगांव, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
२०. ग्राम पंचायत कार्यालय, चिंचोली खुर्द, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
२१. ग्राम पंचायत कार्यालय, वरोडा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
२२. ग्राम पंचायत कार्यालय, कढोली, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
२३. ग्राम पंचायत कार्यालय, कळमना, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
२४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ: www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते २३ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-८८/२०२५ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२५१२२३-एफटीएस-०१८४ दिनांक २३/१२/२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३. | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती / सस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपटे सोबत जोडलेले आहेत.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. उमाशंकर भादुले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डी, एस. कुंभार, अपर जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन

- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-**

१. **श्री. राजेष उलमाले, पोवनीए ता. राजूरा, जि. चंद्रपूर**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार /पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | मौजा पोवनी येथील यांनी सुनावणी मधे पुर्नवसन ची तरतुद प्रदान केलेली होती त्यावर मागणी करून पुर्ण झालेली नाही. प्रदुषणातुन होणाऱ्या धुळीमुळे होणा-या रोग दमा, इत्यादि या साठी नियंत्रण करण्यासाठी उपाय-योजना करण्यात यावी. ब्लास्टींग मुळे घरा ला भेगा पडल्या असतांना त्या बाबत कोणतीही उपायोजना केलेली नाही. संबंधीत गावातील लांेकांना रोजगार मिळाला नसल्याचे सांगण्यात आले त्या वर फेरविचार करण्यात यावा अष्या सुचना करण्यात आल्या. गावालगतच्या उर्वरीत १५ शेतकऱ्यांच्या जमिनी असल्यामुळे ते संपादित करण्यात यावे अषेसुधा त्यांनी सुचवले तसेच खाणीमुळे गावा मधे प्रदुषण झालेले आहे अषाही सुचना त्यांनी केलेल्या आहे. जंगलतोड झाल्यामुळे व जंगली प्राण्यामुळे गावा मधे भितीचे वातावरण तयार झालेले आहे त्यावर उपाय योजना म्हणुन त्या क्षेत्राला काटेरी कुंपन लावण्यात यावे असे सांगण्यात आले. | प्रकल्पधारकाने संगीतले की जे पण ब्लास्टिंग होते ते ब्लास्टिंग स्टडी नुसार होते. जर गोवरी पोवणी विस्तारीत खाण चे उदाहरण घेतले तर सीएसआयआर (सेंट्रल इंस्टिट्यूट ऑफ माइनिंग एंड फ्यूल रिसर्च) त्या अभ्यास नुसार होते. वरुण जेव्हा ब्लास्टिंग होते तेव्हा वाइब्रेशन टेस्टिंग होते. आपण साखरी गावाचा लगत स्मशान घाट वर वाइब्रेशन टेस्टिंग १५.१२.२०२५, १८.१२.२०२५, २३.१२.२०२५ व ०३.०१.२०२६ रोजी केले आहेत. त्यात असे आढळून आले की जे वाइब्रेशन आहे ते सरासरी १.५० एमएम/सेक होते, आणि जे मानक आहे ते ५.० एमएमसेक एवढे आहे. तर यातून आपल्याला दिसुन येते की वाइब्रेशन खूप कमी आहे. या पुढे प्रकल्पधारकाने आश्वासन दिले की जर असे आढळून आले की कुठेही ब्लास्टिंगमुळे नुकसान झाले तर ते यावर कार्यवाही करतील. वरील नमूद रिपोर्टस वरून आढळून येते की ब्लास्टिंग मुळे काहीही नुकसान होत नाहीये. या मधे दर्शून येते की स्मशान घाट जे आहे ते सुमारे ३०० मीटर अंतरावर आहे, आणि साखरी गाव हे ५०० मीटर अंतरावर आहे, त्यामुळे जसे खाणी पासून दूर गेल्यावर वाइब्रेशन निश्चित कमीच होणार. आरोग्य संबंधित प्रकल्पधारका ने |

| | | |
|---|---|---|
| | | सांगीतले की, बल्लारपूर क्षेत्रात, १ चिकित्सालय आणि २ डिस्पेंसरी गावकरांचा सेवेसाठी तत्पर आहेत. गावकर्यां साठी निशुल्क वैद्यकीय सल्ला वा निशुल्क औषधे दिले जातात. कोणत्याही गावकर्यांना सल्ला नाकारला जात नाही. या वर क्षेत्रीय चिकित्सालयात एक्सरे मशीन, ऑक्सीजन सिलिंडर्स, स्पायरोमीटर, फिटल हॉर्ट रेट मॉनिटर, अश्या उपकरणांची सुविधा आहे. रोज सरासरी २०० गावकर्यांना निशुल्क सल्ला दिला जातो. या अतिरिक्त गावात जाऊन नियमित सामाजिक दायित्व अंतर्गत चिकित्सा शिबीर राबवले जातात. यात वर्ष २०२३-२४ मधे सुमारे १७०० ग्रामस्थानी फायदा घेतला आहे, व २०२५-२६ मधे १८०३ गावकर्यांनी फायदा घेतला आहे. या व्यतिरिक्त जर कोणती अत्यावशक घटना घडल्यास गावकरी आहे चिकित्सालयात येतात तिकडे योग्य ते उपचार करून सरकारी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात येते. वायूप्रदूषणाबाबत प्रकल्प धारकाव्दारे सांगीतले की जसे सादरीकरनात माहिती दिली गेली आहे की, त्यांनी खाणीत प्रदूषण नियंत्रणासाठी वेग वेगळे उपक्रम राबवले आहेत, जसे फॉगकैनन मशीन ७ नग, ऑटोमैटिक टायरवाश सिस्टम लावण्यात आले आहे, कोळसा स्टॉक भोवती स्प्रिंकलर्स लावण्यात आले आहे. या अतिरिक्त कोळसा ज्या गौरीडीप रेल्वे साइडिंग ला जात आहे तिकडे, मोबाईल वॉटर टेंकर ने पाणी शिडकावणी होत आहे, व धूळ अडवण्यासाठी वारा अडथळा प्रणाली स्थापित केली आहे. प्रकल्पधारकांनी सांगीतले की आता जे ट्रक मार्फत कोळसा वाहतूक होत आहे, ती बंद होऊन कन्वेयर बेल्ट मार्गे होणार, बेल्ट हून कोळसा सरळ सायलो सिस्टम मधे पडून रेल्वे मार्गे अंतिम स्तानावर पोहचणार. या सायलो सिस्टम मधे बाजूचा सास्ती खाणीचा कोळसा ही जाणार आहे. या वर प्रकल्पधारक ४ ट्रक माउंटेड फॉगमशीन ही लवकरच विकत घेणार आहे. जनावरचा भितीबद्दल सांगण्यात आले की जेव्हा पर्यावरण मंजुरी मिळते तेव्हर प्रकल्पधारक म्हणून ते बंधनकारक असत वृक्षारोपण करण्यासाठी. याबद्दल पुढे सांगण्यात आले की वन अधिनियन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अनुसार, वन्यजीव संरक्षण योजने अंतर्गत ऐकून ६.०० कोटींचा निधीची तरतूद करण्यात आली आहे व त्याला लवकरच मंजुरी प्राप्त होईल. त्यानंतर हा निधी वन विभागाला सोपवण्यात येईल आणि ते या साठी गावात जागरूकता निर्माण करण्यासाठी उपक्रम राबवतील. बेरोजगारीबद्दल जो मुद्दा उचलला गेला त्यावर सांगीतले गेले की, ज्या गावकर्यांची जमीन अधिग्रहित होते त्यांनाच नोकरी दिली जाते. या व्यतिरिक्त काँट्राक्ट दारी नोकर्या ही निर्मित होता. कोणतीही योजना सुरू करण्या पूर्वी प्रोजेक्ट रिपोर्ट बनतो आणि त्यामध्ये जमीन किती आदिग्रहण करावी लागेल भूमिगत कोळसा चा साठा वरून ठरवले जाते. या नंतर सेक्शन ४, ७, ९ व ११ करून ती जमीन गावकर्यांकडून अदिग्रहीत करण्यात येते. उर्वरित जमिनीचा अधिग्रहणा जे राजेश उलमाले यांनी प्रश्न उचला व बर्याचदा लेख निवेदन ही केले त्यावर प्रकल्पधारकानी वरचा अधिकार्यां बरोबर बैठक पण केली आहे, परंतु यातून एकच निष्कर्ष निघालाय की त्या उर्वरित जमिनी खाली कोळसा ही नाहीये त्यामुळे त्या जमिनीचा नाही करण्यात आले. पुनर्वासांचा प्रश्न वर प्रकल्पधारकांनी हे आश्वासन दिला की जर गावकरी कोणती अशी सरकारी जमीन दाखवू शकते जिकडे त्याना पुनर्वसनाची आपत्ती नाही तर त्या जमिनीवर वेकोली प्रशासन पुनर्वसन करून द्यायचे पूर्ण प्रयत्न करेल. |

२. **श्री. नंदकिषोर सुभाष वाढई, सरपंच, ग्रामपंचायत कळमना, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | गवातील पाण्याची पातळी कमी होतांना दिसत आहे. जे गांव १० किमीच्या आत येते त्या गावांना पाणी पुरवठा करण्यात यावा. वेकोलि व्दारे काढण्यात आलेल्या ओ.बी मधुन परिसरातील पाणंद रस्त्याची निर्मिती करण्यात यावी. शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातुन उत्खननानंतर ढिगारे तयार झाले आहे ज्यामुळे रानटी जनावरांचा वावरहोतो आहे त्यामुळे खाण परिसराला | पाणी पातळी कमी होण्याचा विषयाबद्दल प्रकल्पधारकाने सांगीतले की, अमृत सरोवर योजने अंतर्गत धोपताळा, माथरा आणि चार्ली गावात तलाव निर्माण करण्यात आले आहे. यावर देखील प्रकल्पधारक खाणीचं पाणी प्रेशर फिल्टर द्वारे सुध्दीकरण करून गावात पुरवठा करायचे नियोजन करत आहे जेणेकरून सिंचनात व |

| | | |
|---|---|---|
| | तारेचे कुंपण करण्यात यावे जेणेकरून खाण क्षेत्रातुन येणारे वन्यप्राणी शेतषिवारात जाणार नाही. पेवरब्लॉकची व्यवस्था करण्यात यावी. शाळा डिजीटल करण्यात यावी जेनेकरून विद्यार्थी घडेल. वाचनालय डिजीटल करण्यात यावे. प्रदुषण नियंतत्रीत करण्यात यावे. गावात अमृत सरोवर योजने अंतर्गत आर.ओ. मषीन लावण्यात यावी. | पिण्याचा पाण्याची टंचाई कमी होईल. ओबी डम्प मातीचा उपयोग करून रस्ते बांधण्यावर सांगण्यात आले की, बल्लारपूर खुली खाण मधे ओव्हरबर्डन पासुन रेती निर्माण करण्यासाठी प्लांट उभारण्यात आले आहे. जर ते यशस्वी झाले तर ती रेती वापरून रस्ते बांधकामाचे काम करू शकता येईल. पेवरब्लॉक लावण्या बद्दल प्रकल्पधारकाने विवरण दिले जरूर त्यांचा लेखी अर्जावर काम केले जाईल. प्रकल्पधारकाने सांगीतले की धोपताळा गावात डिजिटल वाचनालय उभारण्यात आले आहे. व इतर गावां कडूनही जर लेखी निवेदन आले तर त्यावर विचार गावकर्यांचा उपस्थितीत विचार विनिमय करण्यात येईल. सौर ऊर्जे वर चालणार्या लाइट्सचा मागणीवर प्रकल्पधारका कडून सांगण्यात आले की गौरी, माथरा आणि धोपताळा गावात मागील वर्षात लाइट्स लावण्यात आले आहे, आणि कळमना मधे ही एल.ई.डी लाईट लावण्याचा विचार केला जाईल. |

**३. श्री. बबन नारायण उरकुडे, गोवरी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | बल्लारपुर क्षेत्रा मध्ये गोवरी गांव आहे ज्या गावची ९५ टक्के जमीन अधिग्रहित करण्यात आली आहे त्या गावाचे पुणवर्सन करण्यात यावे. नाला वळतीकरणामुळे १४६ मकान आणि जमीन पाण्या खाली आली होती. गोवरी गांवचे बस स्टॅन्ड च्या नाल्याजवळ १००० मिटर सरक्षण भिंत बांधण्यात यावी. नोकरी संदर्भातील प्रस्ताव लवकरात लवकर मार्गी लावण्यात यावे. जमिन्याच्या बदल्यात लवकरात लवकर नौकरी देण्यात यावे. | नाला वळतीकरण बदल प्रकल्पधारकाने सांगितले की, जे पण वळतीकरण होणार ते CDO, नाशिक चा अभ्यासानुसारच होते. त्यानंतर राज्यस्तरीय नियामक मंडळाचा मंजुरी नंतरच वळतीकरण करण्यात येते. या नियमक मंडळाचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री असतात. तरीच जे ही वळतीकरण येणार्या वर्षात होतील ते नियामक मंडळाचा मंजुरी नंतरच होईल. वळवलेल्या नाला लागत रिटेनिंग वॉल बांधण्या बाबत अभ्यास करून निर्णय घेण्यात येईल व कोणत्याही गावात वळतीकरणा मुळे पूरस्थिती निर्माण न होण्याची काळजी घेण्यात येईल. गौरी पौणी खुली खाण मधील रोजगार बद्दल जे प्रश्न उचलले गेले त्यावर प्रकल्पधारक ने स्पष्टीकरण दिले की आता पर्यंत २३० फाईल रोजगार साठी प्रशासन कडे आले आहेत व त्या सगळ्या वेकोली मुख्यालयाला |

| | | |
|---|---|---|
| | | पाठवले आहेत, आणि त्यातून १२९ रोजगार मंजूर झाले आहेत आणि उरलेले चाचणीत आहेत. गौरी गावाचा पुनर्वसनांचा मुद्द्यावर सांगितले गेले की, गौरी गावा कडून पुनर्वसनांचा ठराव आधीच घेतला गेला आहे आणि तो वेकोलीचा उच्च प्रशासना समोर मांडण्यात आला आहे, व त्यावर त्वरित सकारात्मक परिणाम येऊन गौरी गाव ही लवकरच पुनर्वासांचा खाली येईल. |

**४. श्री. प्रशांत विजयराव घरोटे, सचिव, संघर्ष युवा विकास मंडळ, साखरी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | माती डंम्पींग मुळे भविष्यात नाला वळनी करणामुळे झालेल्या नाल्यांचे पुरामुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान थांबविण्या संदर्भात उपाययोजना केल्या जाव्या. सी.एस.आर चे अंतर्गत ग्रामस्थांचा क्षेत्रीय ईस्पीतळात उपचार केला जावे. कोळसा वाहतुकीमुळे अन-अधिग्रहित शेती मधे प्रदुषण होत आहे त्यामुळे रस्त्याचे बाजुला बांबुचे लागवळ करण्यात यावे. पुर्णवसीत प्रस्तावित गावाचे अधिग्रहणा पासुन वंचित भुमी चे अधिग्रहण करण्यात यावे. वेकोलि व्दारा करण्यात येणा-या प्लांटेषनचे टेंडर महाराष्ट्र राज्य वनविभागाला देण्यात यावे जेनेकरून रोजगार निर्माण होईल. प्रकल्पग्रस्त गांवचे अंतर्गत येणाऱ्या गावांतील अकुषल कामगारांना रोजगार मिळत नाही अष्या लोकांना रोजगार मिळवुन देण्यात यावे. पाणी सिचंन उपाययोजना करूण या पाण्याचा साठा करून पिण्यासाठी शुध्द जल आणि षेतीला सुध्दा या पाण्याचा वापर केला जाईल असा मुद्दा सुचविला आहे. | नाला ववळतीकरण बदल प्रकल्पधारकांने सांगितले की, जे पण वळतीकरण होणार ते CDO, नाशिक चा अभ्यासानुसारच होते. त्यानंतर राज्यस्थरीय नियामक मंडळाचा मंजुरी नंतरच वळतीकरण करण्यात येते. या नियमक मंडळाचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री असतात. तरीच जे ही वळतीकरण येणार्या वर्षात होतील ते नियामक मंडळाचा मंजुरी नंतरच होईल. सिंचनासाठी पाणी पुरवठा करण्या बाबत सांगण्यात आले की अमृत सरोवर योजने अंतर्गत धांपताळा, माथरा आणि चार्ली गावात तलाव निर्माण करण्यात आले आहे. यावर देखील प्रकल्पधारक खाणीचं पाणी प्रेशरफिल्टर द्वारे सुध्दीकरण करून गावात पुरवठा करायचे नियोजन करत आहे जेणेकरून सिंचनात व पिण्याचा पाण्याची टंचाई कमी होईल. मध्यप्रदेश वन विकास निगम ला वृक्षारोपण चे काम दिल्या बद्दल प्रकल्पधारके सांगीतले की सरकारी कंपनी असल्या मुळे L१ कंट्राकदराला काम देणे अनिवार्य आहे. पण यात उल्लेखनीय आहे की MPRVVN ८०% लगतचा गावातले मजुराना काम देते. गावातील युवकांना प्रशिक्षण देण्या बद्दल प्रकल्पधारकाने सांगीतले की पीडीपीटी/पीजीपीटी यात युवकांना प्रशिक्षण दिले जाते, ज्यात मागील ३ वर्षात ऐकून सुमारे ४५०.०० लाख खर्च करण्यात आले आहे. सास्ती गावाचा उर्वरित जमिनीला जाण्याचा रस्त्या बद्दल प्रकल्पधारकान कडून |

| | | |
|---|---|---|
| | | सांगण्यात आले की त्याचा ही प्रस्ताव विकोलिचा मुख्यालयात पोचला आहे. पौनी गावचा पुनर्वसासाठी एनजीओ सर्व हे पूर्ण झाला आहे व पुढे TILR सर्वे साठी प्रस्ताव दिलेला आहे. चिंचोली गावाचा पुनर्वसन बद्दल प्रकल्पधारकानी गावकर्यांना निवेदन केले की ज्या एनजीओ सर्वे साठी एनजीओची नियुक्ती झाली आहे त्याना विरोध नाही करावा जेणे करून लवकरात लवकर पुढील पत्र व्यवहार केला जाऊ शकेल. |

**५. श्री. निकीता रमेष झाडे, सरपंच ग्राम पचायत रामपुर, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | ब्लास्टींग मुळे रामपुर गावातील घरांना जे भेगा पडत आहे त्यामुळे ब्लास्टींग ची तिव्रता कमी करण्यात यावी भडांगपुर गावाचे पुर्नवसन करण्यात आलेले आहे परंतु नाली व रस्त्याचे बांधकाम झालेले नाही ते करण्यात यावे सी. एस.आर अंतर्गत हॉल चे बांधकाम करण्यात आले आहे ते निकृष्ठ दर्जाचे झालेले आहे त्याची चैकषी करण्यात यावी. | प्रकल्पधारकाने संगीतले की जे पण ब्लास्टिंग होते ते ब्लास्टिंग स्टडी नुसार होते. जर गौरी पौणी विस्तृत खाण चे उधारण घेतले तर सीएसआयआर (सेंट्रल इंस्टिट्यूट ऑफ माइनिंग एंड फ्यूल रिसर्च) च्या अभ्यासा नुसार होते. वरुण जेव्हा ब्लास्टिंग होते तेव्हा वाइब्रेशन टेस्टिंग होते. आपण साखरी गावाचा लगत स्मशान घाट वर वाइब्रेशन टेस्टिंग १५.१२.२०२५, १८.१२.२०२५, २३.१२.२०२५ व ०३.०१.२०२६ रोजी केले आहेत. त्यात असे आढळून आले की जे वाइब्रेशन आहे ते सरासरी १.५० एमएम/सेक होते, आणि जे मानक आहे ते ५.० एमएम/सेक एवढे आहे. तर यातून आपल्याला दिसुन येते की वाइब्रेशन खूप कमी आहे. याच प्रकारे जर रामपूर गावात अशी समस्या असेल तर त्याने लेखी निवेदन द्यावं, त्यावर प्रशासन द्वारे वाइब्रेशन टेस्टिंग गावकर्यांचा उपस्थितीत करण्यात येईल आणि काही आढल्यास प्रशासन नक्कीच उचित कार्यवाही करून मदत करण्यासाठी तत्पर आहे. निकृष्ट दर्ज्याचा कामाबद्दल विकोलि प्रशासनाने आश्वासन दिले की त्यावर नक्कीच लगेच योग्य कार्यवाही केली जाईल. |

**६. श्री. रामकृष्ण मधुकर उरकुडे, वरोडा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १. | सी. एस. आर अंतर्गत मंजुर काम लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावे. सी. एस. आरच्या निधीची पुतर्ता करण्यात यावी. गावातील तलावाचे खोलीकरण करण्यात यावे. गावातील सिमेंट रोडची दुरूस्ती करण्यात यावी. सी.एस.आर फंड समान प्रमाणात वाटप करण्यात यावा. धुळ प्रदुषणामुळे होणाऱ्या शेतीचे नुकसान वाचवीण्या करिता उपाय-योजना करण्यात यावे या संदर्भात मी पाच वर्षा पासुन पाठपुरवा करून हे कार्य झाले नाही हे कार्य लवकरात लवकर करण्यात यावे. | वरोडा गावातल्या सामाजिक कार्यांबद्दल प्रकल्पधारकाने सांगीतले की त्यात वाढ केली जाईल. साखरी गावातल्या तलाव खोलीकरण सारख्या किंवा नवीन तलाव निर्माण करण्या सारखे उपक्रम केले जातील. पाण्याची पातळी कमी होण्या बद्दल प्रकल्पधारकाने सांगितले की या वर्षी खाणीत पीझोमीटर सारखे उपकरण लावले गेले आहे ज्याने २४ तास पाणी पातळी मोजण्यात मदत होते ती लावण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त वर्षातून ३ वेळेस पाण्याचा पातळीचे निरीक्षण होत आहे व ते रिपोर्ट्स कंपनीचा वेबसाइट वर उपलब्ध आहेत. तरीच कुणाला शंका असेल तर कंपनीचा कार्यालयात येऊन पडताळणी करू शकता. |

## ७. श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हेद्राबाद:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १. | श्री. सुनंदा रेड्डी यांनी डब्ल्यूसीएलला शुभेच्छा दिल्या आणि विस्तार प्रकल्पाचा प्रस्ताव देऊन अर्थव्यवस्था वाचवल्याबद्दल आणि ३७५० कोटींची बचत केल्याबद्दल डब्ल्यूसीएलचे कौतुक केले जे अन्यथा कोळसा आयात करण्यासाठी गेले असते आणि डब्ल्यूसीएलची मोठी विश्वासार्हता सर्व पर्यावरणवादी म्हणतात की कोळसा खाणीमुळे प्रदूषण होते, परंतु डब्ल्यूसीएल प्रशासनाने ताडपत्री झाकलेले ट्रक, रस्त्यावर पाणी टाकणे आणि ब्लास्टिंगच्या नियंमित प्रदूषणाचे योग्य नियंमण केले आहे. तद्वतच वेकोलि व्दारा ३००० नौकरी तयार करत आहे जे लक्षणीय आहे. त्यांनी वक्षारोपणाचे महत्त्व पटवून देत सामान्य झाडा ऐवजी फळ देणारी, औषधी वनस्पतींना प्राधान्य द्यावे, असे सुचवले तसेच, सरपंच, भारत सरकार, डब्ल्यूसीएल अधिकार्यासह समन्वय समिती स्थापन केली जाईल जेणेकरून मागणी केंद्रित CSR कामे साध्य करता येतील- PAF च्या सर्वांगीण विकासासाठी कौशल्य विकास कार्यक्रमांची शक्यता विचारात घेतली | वृक्षारोपण बद्दल प्रकल्पधारका ने सांगितले की जे वृक्षारोपण होते ते औषधी, फळदार, फुलदार व वेग वेगळे प्रकारचे वृक्ष लागवड करण्यात येते, ज्यात उदाहरणार्थ, नीम, करंज, जामून, आंबा, सिरस, बर, ई. चा समावेश आहे. या सोबत कॉंट्राक्ट अनुसार वृक्षारोपण नंतर ४ वर्ष MPRVVN द्वारे लागवडची देखरेख केली जाते. आरोग्याचा जागरुकते बद्दल प्रकल्पधारकाने सांगितले की मागील वर्षात सुमारे १५-२० आरोग्य शिबीर आजूबाजूचा गावात राबवण्यात आले आहेत, व पुढील वर्षात ही आकडेवारी वाढवण्याचा प्रयत्न निश्चित पद्धतीने केला जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | गेली. त्यांनी असेही सुचवले की आरोग्य प्रतिकारशक्तीचे मूल्यांकन ही आजच्या काळाची गरज आहे. शेवटी त्यांनी वेकोलि ला विनंती केली. | |

## ८. श्री. मिथुन काटवले, माजी सदस्य ग्राम पंचायत साखरी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | ब्लास्टींग ची तीव्रता मुळे गावात होणाऱ्या समस्या दुर करण्या करिता उपाय-योजना करण्यात यावी. | प्रकल्पधारकाने संगीतले की जे पण ब्लास्टिंग होते ते ब्लास्टिंग स्टडी नुसार होते. जर गौरी पौणी विस्तृत खाण चे उदाहारण घेतले तर सीएसआयआर (सेंट्रल इंस्टिट्यूट ऑफ माइनिंगएंडफ्यूल रिसर्च) त्या अभ्यास नुसार होते. वरुण जेव्हा ब्लास्टिंग होते तेव्हा वाइब्रेशनटेस्टिंग होते. आपण साखरी गावाचा लगत स्मशान घाट वर वाइब्रेशनटेस्टिंग १५.१२.२०२५, १८.१२.२०२५, २३.१२.२०२५ व ०३.०१.२०२६ रोजी केले आहेत. त्यात असे आढळून आले की जे वाइब्रेशन आहे ते सरासरी १.५० एमएम/सेक होते, आणि जे मानक आहे ते ५.० एमएम/सेक एवढे आहे. तर यातून आपल्याला दिसुन येते की वाइब्रेशन खूप कमी आहे. याच प्रकारे जर साखरी गावात अशी समस्या असेल तर त्याने लेखी निवेदन द्यावं, त्यावर प्रशासन द्वारे वाइब्रेशन टेस्टिंग गावकर्यांचा उपस्थितीत करण्यात येईल आणि काही आढल्यास प्रशासन नक्कीच उचित कार्यवाही करून मदत करण्यासाठी तत्पर आहे. |

## ९. श्री. राकेश शंकर हिंगाने, माजी ग्रामपंचायत सदस्य, कढोली, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | कोल माईन्स मुळे होणारे प्रदुषण तसेच काटेरी झुडपे निर्माण झालेली आहे त्यामुळे वन्य प्राण्याची संख्या वाढत आहे त्यामुळे त्यावर उपाययोजना करण्यात यावे. गोवरी-पोवनी उपक्षेत्र अंतर्गत गोवरी, कढोली, नांदगाव व मानोली या गावातुन रेल्वे लाईन होणार आहे ज्याची जमीन वेकालि मार्फत अधिग्रहित न करता रेल्वे विभागाव्दारे अधिग्रहित करण्यात येत आहे परंतु त्याला | बाबुलचा रोपण बद्दल प्रकल्पधारक याने स्पष्ट केले की, बाबुलचा रोपण MPRVVN करत नाही आणि ते प्राकृतिक रूपाने वाढले आहेत. यावर उपाय म्हणून प्रकल्पधारकांने बाबुल कापून त्यातून उपयोगकारक काही बनवता येईल अशी योजना आखली आहे, व यावर अमलबजावणी लवकरच होईल. रेल्वे मार्फत जी जमीन आदिग्रहण होत आहे |

| | | |
|---|---|---|
| | वेकोलि व्दारे अधिग्रहित करून मग ती रेल्वे विभागाला हस्तांतरित करण्यात यावे, त्यामुळे जमिनधारकाला जमिनीच्या मोबदल्या सोबत नौकरी सुध्दा मिळु शकेल अशी त्यांची मागणी आहे. | ती रेल्वे चा ट्रान्सपोर्ट वाढवण्या साठी तयार होत आहे आणि कोळसा उत्पादना साठी नाही, तरीच ती जमीन वेकोली प्रशासन आदिग्रहीत नाही करू शकत. |

**१०. श्री. बाबा कावळे, ग्रामवासी, पोवनी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | नाल्यामधिल पाणी काळे झालेले आहे जे पाणी जनावरही पीत नाही त्या पाण्याचे आणि तसेच धुळीवर नियंत्रण केले पाहिजे. गावाचे पुर्णवसन करण्यात येणार आहे या बाबतीत लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी. कोणता ही आदिग्रहण हे लोकांचा फायद्या साठीच आपण करतो, आणि नुकसान साठी नाही. शासन ही लोकांसाठीच काम करता. कायद्या प्रमाणे ही जर लोकनाच फायदा होत असले तर शासनाने करावी हीच विनंती. या गोष्टीचा विचार करून जर पुढील वाटचाल ठरवली तर लोकांचा ही फायदा होईल आणि देशाचाही. | पौनी गावचा पुनर्वसासाठी एनजीओ सर्व्े पूर्ण झाला आहे व पुढे TILR सर्व्े साठी प्रस्ताव दिलेला आहे. प्रकल्पधारकांनी आश्वासन दिले की पौनी गावचा पुनर्वसनाचा काम देखील लवकरात लवकर संपवण्यात येईल. प्रकल्पधारकांनी सांगितले की कोणताही प्रकल्प सुरू करण्या आधी एक गोष्ट बाळगली जाते ज्याने करून कमीत कमी जमिनीवर प्रकल्पाचा परिणाम व्हायला हवा, त्यामुळेच या प्रकल्पातही आपल्याला आढळून येईल की बाह्य ढिगाची उंची ही ६० मीटर वरून ९० मीटर पर्यंत वाढवण्यात येत आहे, हे विचार करूनच की कमीत कमी परिसरावर त्याचा प्रभाव पडावा. तरी सुद्धा विकोली प्रशासन उर्वरित जमीन आदिग्रहण बद्दल विचार करेलच की ती कशी समाविष्ट करून घेता येईल. पौनी गावचा पुनर्वसासाठी एनजीओ सर्वेक्षण पूर्ण झाला आहे व पुढे TILR सर्वेक्षणासाठी प्रस्ताव दिलेला आहे. प्रकल्पधारकांनी आश्वासन दिले की पौनी गावचा पुनर्वसनाचा काम देखील लवकरात लवकर संपवण्यात येईल. |

**११. श्री. सचिन कुडे, उपसरपंच ग्राम पंचायत, सास्ती, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | सास्ती गावाचा सर्वात मोठा विषय तो पाणीपुरवठ्याचा. सास्ती खाण आणि धोपटाळा खाण मुळे सास्ती गावाचा पाणीपुरवठा पूर्ण पने खंडित झाला आहे असे त्याने सांगीतले. आता देखील पाणीपुरवठा हा ४ दिवसानंतर होत आहे. CSR मार्फत पाणीपुरवठ्याची संधी आम्हाला | प्रकल्पधारकानी सांगितले की या आधी बरेच प्रयत्न केले गेलेत जे अपयशी ठरले परंतु पुढेही पाणीपुरवठ्याचे प्रयत्न सुरूच राहतील, आणि अमृतसरोवर अंतर्गत लवकरात लवकर पाणीपुरवठा कसा सास्ती गावाला पोचवता येईल |

| | | |
|---|---|---|
| | २ दा मिळाली. ज्यात १९ लाख खर्च झाले पण उपयोगी आले नाही. हा प्रश्न फक्त सास्ती गावाचा नाही. मागच्या वर्षी देखील गावाला पाणीपुरवठ्याचा ३४ लाखाचा निधी मिळाला ज्यात नदीतून पाणी आणायचं प्रकल्प झाल. परंतु सास्ती गावाला दर रोज ५ लाख लीटर पाण्याची गरज आहे परंतु नदीचा पाण्याचा पुरवठा हा फक्त २.५० लिटर दर ४ दिवसाला होत आहे. धोपटाळा खुली खाण सुरू झाल्यानंतर सास्ती गावाचा पाणीपुरवठा कमी झाला आहे आणि पाण्याची पातळी खालावली आहे. हे खुली खान परियोजनेमुळे परिसराचा ७ किमी त्रिज्या मध्ये होतो. तर कशाप्रकारे प्रशासन सास्ती ला पाणीपुरवठा करणार सांगावे. रोजगार जो निर्माण होतो त्यात शोकांतिका अशी की हातावर मोजण्या अवघ्या नजीकचा लोकांना रोजगार दिला जातो. ज्या गावात सर्वात जास्त त्रास आहे ते सोडून रोजगार चा संध्या UP, MP, राजस्थान आणि आंध्रप्रदेश चा लोकाना दिला जात आहे. सास्ती गाव हे धोपटाळा खाणी पासून फक्त ५०० मीटर दूर आहे, तरीही रोजगार बाबती, पाण्या बाबती, आणि पर्यावरण बाबती ज्या ह्या तृती आहेत त्या पूर्ण कराव्या. गावात RO प्लांट झाला आहे, नळे मिळाले आहेत त्या साठी धन्यवाद दिले. CSR मधे देखील समान वाटप व्हायला हवी ज्याने जास्त फायदा होतो. ज्याचे एक उदाहरण म्हणजे जे सीमेंट उद्योगाचा जवळचे गाव आहेत ती आमचा गावाहून चांगली आहेत. सस्ती गावाला जी वीज पुरवठा MSEB मार्फत होत आहे त्यात धोपटाळा खाण चा बाह्य ढीगा मुळे विज खंडित होत आहे, त्याची विल्लेवाट प्रशासनाणे लावावी. अमृत सरोवर परियोजने अंतर्गत जर धोपटाळा खाण चे पाणी जे सास्ती गावात सध्या बाहेरचा साठी वापरले जात आहे, ते शुद्धीकरण करून सिंचनासाठी आणि पिण्यासाठी सास्ती गावात पुरवठा करावा. MPRVVN मार्फत जे काम गौरी उपक्षेत्रात झाले त्यात वृक्ष लागवडी पूर्ण काम MP मधल्या श्रमिक लावून केले गेले. तिथला रोजगार ही स्थानिकाना मिळावा. सीएसआर मार्फत डिजिटल लाइब्रेरी साठी निवेदन २०२३ पासून दिले आहे परंतु आजवर ते काम गावात झाले नाही, तरीच आमचे निवेदन आहे की लवकरात लवकर डिजिटल वाचनालयाचा काम सास्ती गावात व्हावे ही विनंती. | याची दक्षता घेतली जाईल. MPRVVN बद्दल जे सांगीतले गेले ते खरे असेल तर यावर जरूर कार्यवाही करून त्याना सख्त ताकीद दिली जाईल की रोजगार संधी ही लगतचा गावकर्यांचा दिल्ली जावी. यावर प्रकल्पधारकांनी दर्शवले की MIYAWAKI वृक्षारोपण जे होणार आहे ते महाराष्ट्र वन विभागाला दिले गेल आहे. प्रकल्पधारकांनी आश्वासन दिले की धोपटाळा गाव सारखे डिजिटल लाइब्रेरी, सास्ती गावात ही उभारण्याचे पूर्ण प्रयत्न केले जातील. वीज पुरवठा खंडित होण्या बद्दल ही MSEB ची मदत घेऊन कसा हा प्रश्न सोडवता येईल याची वाटचाल त्वरित करण्यात येईल. वायू प्रदूषणावर प्रकल्पधारक ४ ट्रक माउंटेड फॉग मशीन ही लवकरच विकत घेणार आहे असे सांगीतले, ज्याने वायू प्रदूषणावर आळा घालण्यात मदत होईल. रोजगाराची संधी कशी जवळचा गावकर्यांना मिळेल याची वाटचाल गावकर्यांबरोबर बसून ठरवली जाईल. सध्या स्थिती मधे सुमारे ७०० ग्रामस्थ अप्रत्यक्ष रूपात रोजगार मिळाला आहे. |

१२. **श्री. पुरूषोत्तम गडे, सास्ती, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | या प्रकल्पाचा मी विरोध करत आहे. वेकोलीचे एकच धोरण आहे ते म्हणजे खोटा बोलणे. मागचा १५ दिवसात जे सास्ती खाण मधे ब्लास्टिंग होत आहे त्यात हे बोलता की टेस्टिंग होते, हे खोट आहे. फक्त टेस्टिंगचा वेळेसच मुद्दाम कमी प्रभावाची ब्लास्टिंग केली जाते. ब्लास्टिंग नंतर ही एक तास भर हवेत गंधक पसरलेले असते, या बाबत विकोली ने मागचा जन सुनावणी मधे सांगेतले होते एक समिती गठीत केली जाईल जी अहवाल देईल आणि त्यावर कार्यवाही केली जाईल, त्या बद्दल काय झाले हे सांगावे. दुसरा मोठा प्रश्न तो पाण्याचा, पाण्याची पातळी खाली तर गेलीच आहे त्यावर ते प्रदूषित ही झाले आहे. मागचा सुनावणी नंतर देखील उपचारिकता म्हणून RO प्लांट मधून पाणी पुरवठा करण्यात आला आणि नंतर बंद करून दिला गेला. एक वाइब्रेशन टेस्टिंग मशीन हे प्रशासने गावातच ठेवावे जेणे करून रोजची तापशील गावकर्यांना मिळेल. त्यानंतर एयर मॉनिटरिंगची एक मशीन गावात लावून त्याचा डिस्प्ले गावात लावण्यात यावा ज्याने गावकर्यांना प्रदूषण किती आहे ते कळेल. | CAAQMS लावण्याबद्दल प्रकल्पधारकानी सांगितले की बल्लारपूर क्षेत्रात पुढील ५-६ महिन्यात ४ CAAQMS लागणार आहेत, ज्याचा टेंडर ही झाल आहे, आणि त्यातील एक CAAQMS धोपटाळा खदानीत सास्ती गावाजवळच लागणार आहे, आणि बाकीचे गौरी पौणी खाणीत आणि बल्लारपूर खुल्या खाण आणि बल्लारपूर भूमिगत खाणीत लागणार आहे. प्रकल्पधारकानी सांगितले की या आधी बरेच प्रयत्न केले गेलेत जे अपयशी ठरले परंतु पुढेही पाणीपुरवठ्याचे प्रयत्न सुरूच राहतील, आणि अमृतसरोवर अंतर्गत लवकरात लवकर पाणीपुरवठा कसा सास्ती गावाला पोचवता येईल याची दक्षता घेतली जाईल. |

१३. **श्री. भगवान गर्गते, चिंचाली खुर्द, ता. राजूरा, ज. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | मागील ५ वर्षात कोणताही सीएसआर निधी चिंचोली गावाला प्राप्त झाल नाही या बद्दल वेकोली प्रशासनाचे काय म्हणणे आहे. बरीच निवेदन देऊन ही काही काम झालेले नाही. | प्रकल्पधारकानी गावाची समस्या नोंद करून घेतली, जे काही प्रस्ताव स्किल डेवेलपमेंट आणि प्रशिक्षण बद्दल या पुढे येतील ती पुढ्याचा वर्षाचा सीएसआर निधी मधून पूर्ण केली जातील. |

१४. **श्रीमती सुचिता माऊलीकर, सरपंच, ग्राम पंचायत सास्ती, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | मागचा जण सुनावणी नंतर वारंवार पत्रव्यवहार करून सुधा सास्ती गावाचा पुनर्वसनाचा काहीही घडला नाहीये. मागचा ग्राम सभेत देखील सांगितले गेले होते की पत्र | सास्ती पुनर्वसना विषयी सांगण्यात आले की गावाचे NGO द्वारे बेसलाइन सर्वे झाले आहे. त्यानंतर TILR सर्वे देखील पूर्ण झाला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | व्यवहार होईल, जागेचा पसंती साठी ही प्रत येतील परंतु काहीही झालेलं नाही. PWD चा सर्वे सुद्धा झाला नाहीये, तरीच वेकोली ने पूर्णावसना चा मुद्याला प्रामुख्य द्यावे. जरी वेकोली प्रशासनाकडून बरीच मदत मिळत आहे तरी गावात आरोग्याचा आणि प्रदूषणाचा मोठा धोका आहे. तरीच वेकोली ने पूर्णावसना चा मुद्याला प्रामुख्य द्यावे. गावातील प्रत्येक कुटुंबाला ज्यात रामनगर, कृष्णानगर, झेंडावस्ती सगळ्यांना पुनर्वसनाचा फायदा मिळावा हीच विनंती. आमचे वेकोलि प्रशासन कडून एकच मागणे आहे जसे मीटिंग पूर्वी ब्लास्टिंग आणि प्रदूषण वर नियंत्रण ठेवता तसेच नेहमी ठेवावे. धोपटाळा खाणीचा परिसरात काही शेतजमिनींना अद्याप ही रस्ता करून देण्यात आलेला नाही, तरीच वेकोली ने शेतजमिनी साठी रस्ता बनवून द्यावा. | प्रॉपर्टीकार्ड तयार होऊन आता PWD कडे गेले आहेत. आता PWD कडून सर्वे साठी मागणी होईल जी निधी पुरवल्या नंतर PWD सर्वे देखील लवकरात लवकर करण्यात येईल. या प्रक्रियेला लवकर संपवण्या साठी पूर्ण प्रयत्न सुरू आहेत. रामनगर, कृष्णानगर, झेंडावस्ती याना ही पुनर्वसनात समाविष्ट करून घेण्या बाबत वेकोली प्रशासनाने माहिती दिली की ती जमीन अतिक्रमण केलेली जमीन आहे आणि त्याचा पुनर्वसनासाठी माननीय जिल्हाधिकार्यांसोबत समिती गठन करून त्यावर निर्णय घ्यावा लागेल. |

**१५. श्री. सचिन माऊलीकर, सास्ती, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १. | वेकोली प्रशासन ७०० लोक दाखवून आमचा गावतले फक्त लोकाना रोजगार देत हे चालणार नाही. पुनर्वसन विषयी म्हंटलं तर फक्त प्रॉपर्टीकार्ड धारकानाच फक्त पुनर्वसनाचा मोबदलो मिळेल असे वेकोलीचे धोरण आहे. तसे नसून गावात राहणार्या सगळ्यानाच त्याचा फायदा मिळावा. पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्या साठी वेळोवेळी विकोली प्रशासन मदत करत असते परंतु जो ठेकेदार काम करतो तो अतिशय निकृष्ठ दर्ज्याचे काम करतो. रामनगर मधून जे पाणीपुरवठ्याचे काम झाले त्यात पाइप नेहमी फुटत राहता यावर लक्ष द्यावे. आमचे विकोली प्रशासन कडून एकच मागणे आहे जसे मीटिंग पूर्वी ब्लास्टिंग आणि प्रदूषण वर नियंत्रण ठेवता तसेच नेहमी ठेवावे. | समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**१६. श्री. विजय मिलमिले, सरपंच, ग्राम पंचायत, चिंचोली, ता. राजूरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | शेड चे काम हे वर्ष २०१९-२० मधे झाले आहे. मागील ५ वर्षात कोणताही सीएसआर निधी चिंचोली गावाला प्राप्त झाल नाही या बद्दल वेकोली प्रशासनाचे काय म्हणणे आहे. कार्यालयात ५० चक्कर करून देखील ही दखल घेतली नाही. CSR निधी समप्रमाणात वाटप व्हावी. | प्रकल्पधारकानी गावाची समस्या नोंद करून घेतली, जे काही प्रस्ताव स्किलडिवेलपमेंट आणि प्रशिक्षण बद्दल या पुढे येतील ती पुढ्याचा वर्षाचा सीएसआर निधी मधून पूर्ण केली जातील. |

जनसुनावणीदरम्यान एकही व्यक्ति ऑनलाईन प्रणालीद्वारे हजर नव्हती. सदर जनसुनावणीदरम्यान ऑडिओ व व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात आली आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे स्र्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ०५ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(उमाशंकर भादुले)**
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(तानाजी यादव)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर

**(डी.एस.कुंभार)**
अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा अपर
जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर,
जिल्हा चंद्रपूर.